# बिंदीपासून कर्णभूषणांपर्यंतचे अलंकार

## मनोगत

सण-उत्सव इत्यादी म्हटले की, आजही हिंदु स्त्रिया अंगभर अलंकार घालून सुशोभित होतात. अलंकारांमुळे स्त्रीचे लावण्य अधिक मोहरते. विविध प्रकारचे अलंकार घालण्यामागील उद्देश केवळ सौंदर्यवृद्धी हा नाही. हिंदु धर्मात प्रत्येक अलंकार त्या त्या विशिष्ट स्थानी घालण्यास सांगण्यामागे अर्थपूर्ण असा अध्यात्मशास्त्रीय दृष्टीकोन आहे. हाच दृष्टीकोन या ग्रंथात सांगितला आहे.

अलंकार ईश्वरी चैतन्याचे संग्राहक आणि वाईट शक्तींचे निर्दालक आहेत. अलंकार घातल्यामुळे वाईट शक्तींचा त्रास अल्प होऊन शरिरातील त्या त्या स्थानाची काळी शक्ती नष्ट होण्यासमवेत सात्त्विकता वाढायलाही साहाय्य होते. अलंकार घातल्यामुळे होणारे सूक्ष्मातील परिणाम स्थूल डोळ्यांना दिसत नाहीत, तर ते सूक्ष्मातून अनुभवता येतात. सूक्ष्मातील कळण्याची क्षमता असणार्‍या सनातनच्या काही साधिकांनी या संदर्भात केलेली ‘सूक्ष्म-ज्ञानविषयक परीक्षणे’ आणि काढलेली ‘सूक्ष्म-ज्ञानविषयक चित्रे’ पाहिल्यावर अलंकारधारणाचे महत्त्व मनावर अधिक खोलवर बिंबते. अलंकारधारणामुळे साधिकांना आलेल्या अनुभूती अलंकारांविषयी श्रद्धा वाढवतात.

अलंकारधारणातून अपेक्षित असा आध्यात्मिक लाभ होण्यासाठी अलंकार सात्त्विक असणे आवश्यक असते. अलंकाराचा आकार आणि त्यावरील कलाकुसर, तसेच अलंकार घालणारी व्यक्ती सात्त्विक असल्यास अलंकारातून सात्त्विकता अन् चैतन्य कसे प्रक्षेपित होते, हे ग्रंथात दिलेल्या काही सूक्ष्म- ज्ञानविषयक प्रयोगांवरून लक्षात येईल. सात्त्विक अलंकारांच्या जोडीला तामसिक अलंकार कसे ओळखावेत, याचा अभ्यास व्हावा यासाठी दोन्ही प्रकारच्या अलंकारांची छायाचित्रे आणि ‘सूक्ष्म-ज्ञानविषयक परीक्षणे’ ग्रंथात दिली आहेत.

अलंकारधारणाचे महत्त्व लक्षात घेऊन त्यानुसार कृती करून, म्हणजे अलंकार धारण करून ईश्वराच्या जवळ जाण्याचा मार्ग अधिक सुकर व्हावा, ही श्री गुरुचरणी प्रार्थना. – **संकलक**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | केसात घालण्याचे अलंकार | १५ |
| २. | कुंकू (सौभाग्यालंकार) | ३० |
| ३. | कानात घालण्याचे अलंकार | ४० |
| ४. | नाकात घालण्याचे अलंकार : चमकी आणि नथ | ६३ |
| ५. | सोन्याची साखळी तिच्या नेहमीच्या स्थानी न घालता दुसऱ्या | ७५ |
| ६. | अलंकारांशी संबंधित देवता, देवतेचा कार्यरत होणारा भाव, अलंकार परिधान करणाऱ्यातील आणि पहाणाऱ्यातील भाव | ७८ |
| ७. | आध्यात्मिक त्रास असणारे आणि नसणारे जीव यांना अलंकार परिधान केल्यामुळे तारक अन् मारक स्तरांवर होणारा लाभ | ७९ |
| ८. | विविध अलंकारांमुळे जिवाला येणाऱ्या अनुभूतींचे प्रमाण | ७९ |
| 卐 | **काही आनुषंगिक सूत्रे** | ८० |
| 卐 | **अलंकारांसंबंधी टीका किंवा अयोग्य विचार अन् त्यांचे खंडण** | ८४ |


---

**टीप :** ग्रंथात काही सूत्रांच्या शेवटी मराठी किंवा इंग्रजी संकेतांक केवळ कार्यालयीन सोयीसाठी दिले आहेत.

### ग्रंथात काही ठिकाणी ‘परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले’ यांचा उल्लेख ‘प.पू. डॉ. जयंत आठवले’ असा असण्यामागील कारण

प.पू. डॉ. जयंत आठवले यांचे ज्येष्ठ बंधू सद्गुरु डॉ. वसंत आठवले यांनी प.पू. डॉ. जयंत आठवले यांच्यावर २८.१.२०१३ या दिवशी केलेल्या ‘श्री सद्गुरुवंदन’ या काव्यात त्यांना ‘परात्पर गुरु’ असे संबोधले. तेव्हापासून प.पू. डॉ. आठवले यांचा उल्लेख ‘परात्पर गुरु’ असा करण्यास आरंभ झाला. त्यामुळे ग्रंथात फेब्रुवारी २०१३ पूर्वीच्या लिखाणात त्यांच्या नावामागे ‘प.पू.’ असे म्हटले आहे, तर फेब्रुवारी २०१३ नंतरच्या लिखाणात ‘परात्पर गुरु’ असे म्हटले आहे.